32

**राज्य शासकीय महिला कर्मचा-यांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसापर्यंत वाढविण्याबाबत.**

AZAD MAHAVIDYALAYA AUSA AUSA Dist. LATUR

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:अरजा-१४०९/प्र.क्र.८/०९/सेवा-६,**
**मंत्रालय , मुंबई -४०००३२**
**दिनांक :- २४ ऑगस्ट ,२००९.**

**वाचा-** १)शासननिर्णय , वित्तविभाग क्रमांक:अरजा-१४९०/१२/सेवा-९ , दिनांक २८/७/१९९५.
२) शासन शुध्दीपत्र , वित्त विभाग क्रमांक: अरजा-१४९०/१२/सेवा-९ , दिनांक ४/११/१९९६.

**शासन निर्णय**

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम ७४ मध्ये विहित केलेल्या तसेच यामध्ये प्रस्तावनेतील शासन निर्णय, दिनांक २८ जुलै, १९९५ अन्वये सुधारित केलेल्या शर्तींच्या अधिन राहून राज्य शासनातील महिला कर्मचा-यांना ९० दिवसांची प्रसूती रजा मंजूर करण्यात येते. केंद्र शासनाने सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनातील महिला कर्मचा-यांना प्रसुती रजेचा कालावधी १३५ दिवसांवरुन १८० दिवसांपर्यंत वाढविला आहे. याच धर्तीवर राज्य शासनातील महिला कर्मचा-यांना सध्या अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजा १८० दिवसांपर्यंत वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. याबाबत आता शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

१) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम ७४ मधील तरतुदीनुसार राज्य शासकीय महिला कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढविण्यात यावी. या सुविधेचा लाभ फक्त दोन अपत्यांपुरताच मर्यादित राहील. प्रसूती रजा मंजूर करण्याच्या इतर शर्ती पूर्वीप्रमाणे यापुढेही लागू राहतील.
२) या सुविधेचा लाभ आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.
३) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील यासंबंधातील विद्यमान तरतुदी या शासन निर्णयातील तरतुदीपुरते सुधारण्यात आले असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमामध्ये रीतसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.
४) सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००९०८२४१३०२२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

नमिता नं.पाटील
**शासनाच्या उप सचिव.**

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.(८० प्रती)
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र,नागपूर. (८० प्रती)

रोटो/एच-१४४९[ ६०००+५०-८-२००९]-१

[ कृ.मा.प.

C:3
5

31

शासन निर्णय क्र
आवक क्रमांक- 892
दिनांक- 29/3/10

विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील महिला कर्मचाऱ्यांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसापर्यंत वाढविणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.प्ररजा २०१०/(८६/१०)-विशि-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मार्च, २०१०.

993
27.3.10
29.3.10
Teaching uni.

वाचा :- शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अरजा १४०९/प्र.क्र.८/०९/सेवा-६, दि.२४-८-२००९.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने सहाव्या केंद्रिय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनातील महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेचा कालावधी १३५ दिवसांवरुन १८० दिवसांपर्यंत वाढविला आहे. या धर्तीवर राज्य शासनाने संदर्भाधीन दिनांक २४-८-२००९ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनातील महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेचा कालावधी ९० दिवसांवरुन १८० दिवसांपर्यंत वाढविला आहे. त्याप्रमाणे विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजा १८० दिवसांपर्यंत वाढविण्याची बाबत शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

२. वित्त विभागाच्या क्र.अरजा १४०९/प्र.क्र.८/०९/सेवा-६, दि.२४-८-२००९ च्या शासन निर्णयातील सर्व तरतूदी विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील महिला कर्मचाऱ्यांना जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत..

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०१००३०६१६३४३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपाल व कुलपतिंचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे (महाविद्यालयांना द्यावयाच्या १२०० जादा प्रतींसह),
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

2/3

D:\Documents and Settings\Tulaskar\Desktop\Final G.R. (6th pay teaching)1508.doc/Page 29 of 30



राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यांची

C.3.1
2
7

Hindustani Education Society's

# AZEEM SHIKSHAK SAHAKARI PATSANSTHA, AUSA

List of Members of Azad Mahavidyalaya, Ausa Dist. Latur

| Sr.No. | Name of the Employee | Designation | Remarks |
|---|---|---|---|
| 1 | DR. SARDARPASHA A.K. | ASSOCIATE PROFESSOR | |
| 2 | SHRI. JAHAGIRDAR T.A. | ASSOCIATE PROFESSOR | |
| 3 | SHRI. MANGRULE M.S. | ASSISTANT PROFESSOR | |
| 4 | SHRI. ANSARI N.I. | ASSISTANT PROFESSOR | |
| 5 | SHRI. SHINDE D.A. | ASSISTANT PROFESSOR | |
| 6 | SHRI. SHAIKH A.N. | ASSISTANT PROFESSOR | |
| 7 | SMT.SAYYED K.N. | ASSISTANT PROFESSOR | |
| 8 | SHRI. ZADE M.B. | ASSISTANT PROFESSOR | |
| 9 | SHRI. BAROTE M.A. | ASSISTANT PROFESSOR | |
| 10 | SHRI. LADDAF S.K. | ASSISTANT PROFESSOR | |
| 11 | SHRI. INAMDAR M.M. | ASSISTANT PROFESSOR | |
| 12 | SHRI. PATHAN A.V. | ASSISTANT PROFESSOR | |
| 13 | SHRI. PATHAN A.A. | ASSISTANT PROFESSOR | |
| 14 | SHRI. ACHOLE P.B. | ASSISTANT PROFESSOR | |
| 15 | SHRI. HASHMI I.M. | ASSISTANT PROFESSOR | |
| 16 | SHRI. BHOGE D.G. | ASSISTANT PROFESSOR | |
| 17 | SHRI. KSHIRSAGAR D.D. | ASSISTANT PROFESSOR | |
| 18 | Shri. JAWALE V. G. | ASSISTANT PROFESSOR | |
| 19 | SHRI. SAYYED N.K. | ASSISTANT PROFESSOR | |
| 20 | SHRI. SHINDE A.R. | ASSISTANT PROFESSOR | |
| 21 | SHRI. TINGARE G.D. | ASSISTANT PROFESSOR | |
| 22 | SHRI. SURYAWANSHI R.V. | ASSISTANT PROFESSOR | |
| 23 | SHRI. BADGIRE S.V. | ASSISTANT PROFESSOR | |
| 24 | SMT. MOTEGAONKAR M.B. | ASSISTANT PROFESSOR | |
| 25 | SHRI. SHAIKH S.B. | ASSISTANT PROFESSOR | |
| 26 | SHRI. INGALE B.D. | ASSISTANT PROFESSOR | |
| 27 | SHRI. KOTWAL M.M. | ASSISTANT PROFESSOR | |
| 28 | SHRI. CHAVAN S.S. | ASSISTANT PROFESSOR | |
| 29 | SHRI. JADHAV B.N. | ASSISTANT PROFESSOR | |
| 30 | SAW. KORDE S.S. | ASSISTANT PROFESSOR | |
| 31 | SMT. SHAIKH Y.N. | HEAD CLK | |
| 32 | SHRI. SURYAWANSHI B.J. | SR CLERK | |
| 33 | SHRI. SHAIKH S.M. | JR CLERK | |
| 34 | SHRI. ARAB F.A. | JR CLERK | |
| 35 | SHRI. MORE D.M. | LIB ATTEN | |
| 36 | SHRI. SAYYED S.S. | LAB ASSIST | |
| 37 | SHRI. PATEL A. L. | LAB ASSIST | |
| 38 | SHRI. LADDE N.V. | LIB ATTEN | |
| 39 | SHRI. SHAIKH H.M. | LAB ATTEN | |
| 40 | SHRI. ZIRMIRE B.M. | LAB ATTEN | |
| 41 | SHRI. ATTAR A.H. | LAB ATTEN | |
| 42 | SHRI. SHAIKH R.S. | LAB ATTEN | |
| 43 | SHRI. WAGHMARE M.T. | PEON | |
| 44 | SHRI. SHINDE D.K. | PEON | |
| 45 | SHRI. SONAR N.F. | PEON | |
| 46 | SHRI. MOUZAN A. S. | PEON | |
| | TOTAL A+B | | |

सचिव चेअरमन
अझीम शिक्षक सहकारी पतसंस्था म.
औसा ता. औसा जि. लातूर